पोलीस उप अधीक्षक कार्यालय,
अॅन्टी करप्शन ब्युरो, जालना
दुरध्वनी क्रमांक ०२४८२ –२२०२५२
टोल फ्री क्रमांक –१०६४
dysp.acbjalna@mahapolice.gov.in.
dyspacbjalana@gmail.com

**प्रेस नोट** दि. २२.०५.२०२४

**गाय गोठा बांधकामाचे अनुदानाचा दुसरा टप्पा देण्यासाठी ५,००० रुपये लाचेची मागणी करणारे कंत्राटी अभियंत्यास अॅन्टी करप्शन ब्युरो, जालनाचे पथकाने पकडले.**

| | | |
|---|---|---|
| आलोसे यांचे नाव | – | महेश अंकुशराव बोराडे, वय ३६ वर्ष व्यवसाय कंत्राटी अभियंता, एम आर जी एस पंचायत समिती मंठा जि जालना, रा. मंठा फाटा मंठा, जि. जालना ( **कंत्राटी** ) |
| गुन्हा घ ता वेळ ठिकाण | – | दि. १२.०२.२०२४ रोजी, दि. २१.०३.२०२४ आणि दि. २२.०३.२०२४ रोजी पंचायत समिती कार्यालय, मंठा जि. जालना येथे. |
| **लाचेची रक्कम** | – | ७,००० रु लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ५,००० रु लाच स्विकारण्याचे मान्य केले. |

तक्रारदार यांना शासनाच्या महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत गाय गोठा बांधकामासाठी ७७,००० रुपये अनुदान मंजुर झालेले असुन त्यांचे पहीला हप्ता म्हणुन ९,००० रुपये त्यांना मशटरव्दारे प्राप्त झाले असुन दुसरा हप्त्याचे ९,४४७ रुपये त्यांना देण्यासाठी आरोपी महेश बोराडे, कंत्राटी अभियंता, एमआरजीएस पंचायत समिती, कार्यालय मंठा याने तक्रारदार यांचेकडे ७,००० रुपये लाचेची मागणी केली, परंतु तक्रारदार यांची त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, जालना यांचेकडे तक्रार केली.

सदर तक्रारीवरुन दिनांक १२.०२.२०२४ रोजी तसेच दि. २१.०३.२०२४ रोजी आणि २२.०३.२०२४ रोजी आरोपी याचे लाच मागणीबाबत पडताळणी केली असता आरोपीने तक्रारदार यांचे गाय गोठा बांधकामाचे मंजुर अनुदानाचे रकमेपैकी दुसरा हप्ता तक्रारदार यांना देण्यासाठी पंचासमक्ष ७,००० रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ५,००० रुपये लाचेची रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शवुन शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्याचे निष्पण्ण झाले आहे.

आरोपी महेश अंकुशराव बोराडे, वय ३६ वर्ष व्यवसाय कंत्राटी अभियंता, एम आर जी एस पंचायत समिती मंठा जि जालना, रा. मंठा फाटा मंठा, जि. जालना ( **कंत्राटी** ) यास ताब्यात घेवून त्याचेविरुध्द पोलीस ठाणे मंठा, जि जालना येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे.

**तसेच अॅन्टी करप्शन ब्युरो, जालना यांचेकडुन आवाहन करण्यात येते कि, कोणी लोकसेवक स्वत अगर इतरांमार्फत शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खासगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास ०२४८२ – २२०२५२, तसेच टोल फ्री कं १०६४ वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं.९०१११२५५५३ व dysp.acbjalna @maha police.gov.in आणि dyspacb jalana @gmail.com वर संपर्क करावा.**

पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना

**पोलीस उप अधिक्षक**
**अॅन्टी करप्शन ब्युरो, जालना.**